स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**

**उपसंचालक,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,**
**छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर**
*ज्योती नगर, उस्मानपुरा रोड कृषी कार्यालयाच्या बाजूला छत्रपती संभाजीनगर*
दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३४०६६Email- ddau.gsda@gmail.com

*पाणी अडवू पावसाचे, जीवन घडवू माणसाचे*

जा.क्र. उपस/भूसवियं/औ/आवेधन/खा.वाहन भाडे/पं.क्र.१४१ / 435 /२०२६ दिनांक 27 MAR 2026

**जिप व कार वाहन भाडे तत्वावर लावणे बाबत.**

दरपत्रक सुचना क्रं ०१/२०२६

१. संपुर्ण निविदा प्रक्रिया ही ऑफलाईन पद्धतीने राहिल.
२. निविदा संदर्भातील कागदपत्रे अटी व शर्ती यांचे माहिती करीता या कार्यालयात दिनांक ०१.०४.२०२६ रोजी १०.०० वाजेपासून उपलब्ध राहिल.
३. निविदा धारकाने निविदा दिनांक ०१.०४.२०२६ रोजी सकाळी १०.०० ते दिनांक १०.०४.२०२६ दुपारी १४.०० वाजेपर्यंत दोन लिफाफे (तांत्रिक व दराचा शिलबंद) प्रत्यक्ष कार्यालयात सादर करावयाचे आहे.
४. आपले दरपत्रक निविदा स्विकृत झाल्यास आपणास करारनामा रू.५००/- च्या मुद्रांकावर करावा लागेल.तसेच पुढील कालावधीत कामादेश प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात सुरक्षा अनामत रक्कम रू.२०,०००/- ची बँक गॅरंटी उपसंचालक ,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्राणा छत्रपती संभाजीनगर यांच्या नांवे जमा करावी लागेल.
५. या दरपत्रकातील बाबी संबधी काही प्रकरण न्याय प्रविष्ठ झाल्यास अथवा या संबधी न्यायालयात जावे लागल्यास त्याचे न्यायक्षेत्र मर्यादा छत्रपती संभाजीनगर क्षेत्रापुरतीच मर्यादित राहिल.

**६. प्रथम लिफाफा -तांत्रिक- डाक्युमेंट**

पहीला लिफाफा हा तांत्रिक दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा राहिल.ज्यात खालील बाबीचा समावेश असेल.

१. आर.सी./टी.सी.बुक
२. पॅन कार्ड
३. वाहनाचा टॅक्सी परवाना (Taxi permit.see MMV rule ७२ (१) (II)
४. वाहन चालक/मालक यांचा वाहन चालविण्याचा परवाना (Driving Licence)
५. वाहनाचा अद्यावत विमा परवाना (Valid Insurance copy)
६. Tours & Travels Shop Act Valid Licesence copy (Tours & Travelsकंपनी/एजन्सी फर्म करीता )
७. Service Tax Registrtion (Tours & Travelsकंपनी/एजन्सी फर्म करीता )
८. सोबत दिलेलया नमुना १ मधिल संपुर्ण माहिती मालक/फर्मधारक यांचे स्वाक्षरीसह.

**७. दुसरा लिफाफा**

दुस-या सिलबंद लिफाफ्यात दरपत्रका सोबत दिलेल्या विहीत नमुना क्रं २ मध्ये वाहन भाडयाचा (इंधन/वंगन व वाहन चालक व सर्व करासह दर राहतील)

वरिल दोन्ही सिलबंद लिफाफे उपरोक्त दिनांकाच्या व वेळेच्या आत उपसंचालक कार्यालयास सादर करावे.

अटी व शर्ती :-

१.वाहन सदैव सुस्थितीत व स्वच्छ केलेले असावे तसेच वाहन चालक निर्व्यसनी व स्वच्छ गणवेशात असावा.

२.वाहनाचा वापर छ. संभाजी नगर विभागातील जिल्हयात/ इतर जिल्ह्यात, शहर, ग्रामीण भागात केला जाईल.

३.पार्कीगचा खर्च इतर सर्व व सेवाकराचा समावेश दरामध्ये समाविष्ट असावा. तसेच टोलटॅक्स रक्कम देयकात वेगळयाने दर्शवावी, देयकासोबत टोलटॅक्स भरले बाबतची पावती सादर करणे बंधनकारक आहे.

४.करार कालावधीत वाहनाचा अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी वाहन मालकाची राहील.

५.वाहनाचे किरकोळ अथवा मोठ्या स्वरुपाची दुरुस्ती ही वाहन मालकाची जबाबदारी राहील. तात्पुरती दुरुस्ती (पिरॉडीकल), लागणारे इंधन, वंगण, मजूरी, वाहनाच्या दुरुस्ती व देखभाल खर्च यात समाविष्ठ राहील. व त्यासाठी कुठलाही मोबदला या कार्यालयाकडून दिला जाणार नाही.

६. किरकोळ स्वरुपाची दुरुस्ती एक दिवसात तर मोठ्या स्वरुपाचीदुरुस्ती दोन दिवसात करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

७. एक दिवसापेक्षा जास्त कालावधीत वाहन उपलब्ध न केल्यास पर्यायी वाहन उपलब्ध करुन द्यावे लागेल.पर्यायी वाहनाची व्यवस्था करणे शक्य न झाल्यास या कार्यालयामार्फत पर्यायी वाहनाची व्यवस्था करण्यात येईल व सदर पर्यायी वाहनासाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आपल्या देयकातून वसूल करण्यात येईल.

८. वाहन दुरुस्तीसाठी केलेली धावसंख्या व वाहन कार्यालयास आणणे करीता केलेली धावसंख्या या कार्यालयाच्या धावेत /देयकात समाविष्ठ राहणार नाही.पुर्व परवानगी शिवाय वाहन मालक/चालक वाहनाचे खाजगी वापर करणार नाही,अपरिहार्य कारणास्तव वाहनाच्या केलेल्या खाजगी वापर एकुण धावसंख्येतून वजा करण्यात येईल.

९.वाहनाची बनावट १ जानेवारी २०२० नंतरची असावी. नविन वाहनास प्राधान्य दिले जाईल. वाहनाचा टॅक्स, विमा, पी.यु.सी. वाहन चालकाचे लायसन्स अद्यावत व नुतनीकरण केलेले असणे आवश्यक आहे.

९. वाहन केवळ मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहिल्यास व कार्यालयाच्या कामावर अनिष्ठ परिणाम झाल्यास निर्धारीत कंत्राटनूसार वाहन बंद कालावधीतील तेवढ्या दिवसाचे पैसे मासिक भाडयातून कपात करण्यात येतील.

११.भाडे तत्त्वावर पुरवठा करण्यात येणारे वाहन हे मोटर वाहन अधिनियमनुसार .(Taxi permit.see MMV rule ७२(१) [(II)]) परवानाधारक असणे आवश्यक आहे.

१२. वाहन कार सिडान प्रकारातील असावे तसेच जिप वाहन (बोलेरो,सुमो ई.) प्रकारातील असावे.

१३.वाहनाचे दर आदेश दिल्यापासून १० महिन्याकरीता लागू राहतील. दरम्यानच्या काळातील होणारी इंधन दर वाढ, वाहनाचा वापर, दुरुस्ती व तत्सम वाढ विचारात घेऊन दर भरावेत. दरम्यानच्या काळात कोणत्याही सबबी खालील दर वाढ मिळणार नाही. कार्यालयास त्यापुढील कालावधीत वाहनांची आवश्यकता असल्यास व वाहन धारक तयार असल्यास याच दरावर वाहन पुढेही नियमाप्रमाणे नियमित करता येईल.

१४.वरील कालावधीत या कार्यालयास शासनाकडून नवीन वाहन उपलब्ध झाल्यास, वित्तीय कारण असल्यास अथवा काही अपरिहार्य कारण असलेस भाड्याने घेतले जाणारे वाहन पुर्व सूचना न देता त्वरीत बंद करण्यात येईल.व हा करार रदद करणेत येईल.

१५. वाहन भाड्याने लावल्यानंतर वाहनाच्या व वाहन चालकाच्या बाबतीत सर्व कागदपत्रे पुर्ण व अद्यावत करण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

१६. वाहनाच गैरवापर झाल्याचे आढळून आल्यास,वाहन चालकाची वर्तनुक योग्य नसल्यास अथवा वाहनाबाबत कार्यालयातील अधिकारी यांनी तक्रार केल्यास, वाहन धावसंख्येत लॉगबुकमध्ये फेरफार केल्यास वाहन पुर्व कल्पना न देता तात्काळ बंद करण्यात येईल व सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

१७. दरपत्रक स्विकृती नंतर पात्र दरपत्रक धारकास ८ दिवसात रुपये ५००/- मुद्रांकावर वरील अटी व शर्ती नुसार करारनामा करुन द्यावा लागेल कार्यालयाच्या अनुदान नियोजनाप्रमाणे कामादेश दिलेनंतर तात्काळ वाहन पुरविणे बंधनकारक आहे.व कामादेशानंतर पुढील १५ दिवसात अनामत रक्कम रू.२००००/- (रू.विस हजार) बँक गॅरंटी उपसंचालक ,भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्राणा छत्रपती संभाजीनगर यांच्या नांवे जमा करावी लागेल.या कार्यवाहीत हयगय झाल्यास आपला करार रदद करणेत येईल.

१८. वाहन धारकास कोणत्याही प्रकाराचा अग्रीम देय राहणार नाही.

१९.दर महिन्यास विहीत नमुन्यात झालेल्या धाव संख्येनुसार देयक सादर करणे बंधकारक राहील. देयक सादर करतांना लॉगबुक पडताळणी करता सादर करावे. वाहन वापरलेल्या अधिकाऱ्यांची सही लॉगबुकमध्ये घेणे आवश्यक आहे. लॉगबुक सादर न केल्यास देयक पारीत करता येणार नाही. लॉगबुक अदयावत ठेवण्याची जबाबदारी संबंधित वाहन चालकाची/मालकाची राहील.

२०. शासन नियमानुसार वाहन पुरवठादारास (फर्मधारकास)जीएसटी क्रमांकासह देयक सादर करणे बंधनकारक राहील व देयकातुन आयकर व इतर कपाती करण्यात येईल.तसे उपलब्ध अनुदानानुसार देयकाची रक्कम अदा करण्यात येईल,सदर रकमेवर व्याज देय होणार नाही.

२१.निविदा धारकाने निविदेमध्ये भाग घेतांना महाराष्ट्रात कुठेही काळ्या यादीतील नाव नसणे आवश्यक आहे.

२२. वाहन पुरवठा अंदाजित कालावधी १० महिन्याचा असुन सदरील कालावधी वाढविण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीतांना राहील.

२३. वाहनास एकूण रू.५००००/-(रू.पन्नास हजार) ची मासीक भाडे मर्यादा आहे.एकूण मासिक भाडे रू ५००००/-च्या आतच अदा करण्यात येईल.

२४. कामाच्या गरजेनुसार वाहन कोणत्या प्रकरातील (जिप/कार) भाडे तत्वावर घेण्याचे अधिकार उपसंचालक भु.स.वि.य. छत्रपती संभाजीनगर यांचे राहतील.

२५. कोणतीही निविदा अथवा सर्व निविदा योग्य अथवा कोणत्याही कारणासह नाकारण्याचा अधिकार उपसंचालक भु.स.वि.य. छत्रपती संभाजीनगर यांनी राखून ठेवलेला आहे.

वरिल अटी वशर्ती मला मान्य आहेत.

वाहन धारक/फर्म धारकाची स्वाक्षरी

(पी.एम.शेलार)
उपसंचालक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्राणा,
छत्रपती संभाजीनगर.

प्रत - नोटीस बोर्ड

**नमुना क्रं -१**

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीनगर.

### वाहनाची तांत्रिक /कागदपत्र तपासणी बाबत संक्षीप्त माहिती तसेच तांत्रिक लिफाफा मध्ये द्यावयाचे कागदपत्रे

**१.वैयक्तीक/स्वत: वाहन मालक/धारकाकरीता**

| अ.क्र | तपशिल | जोडले आहे.<br>होय/ नाही |
|---|---|---|
| १ | आर.सी ./टी.सी.बुक | |
| २ | पॅन कार्ड | |
| ३ | वाहनांचा टॅक्सी परवाना.(Taxi permit.see MMV rule - ७२(१) [(II)]) | |
| ५ | वाहनाचा अदयावत विमा परवाना.(Valid insurance copy) | |
| ६ | अदयावत P.U.C.प्रमाणपत्र. | |

**२.फर्मधारक किंवा ट्रव्हर्ल्स ‘एजन्सी असलेस**

| अ.क्र | तपशिल | होय/ नाही |
|---|---|---|
| १ | Tours & Travels Shop Act Valid Licsence Copy | |
| २ | पॅन कार्ड | |
| ३ | GST/ Service Tax Registration copy | |
| ४ | आर.सी ./टी.सी.बुक | |
| ५ | पॅन कार्ड | |
| ६ | वाहनांचा टॅक्सी परवाना.(Taxi permit.see MMV rule - ७२(१) [(II)]) | |
| ७ | वाहन चालक यांचा वाहन चालविण्याचा परवाना. .(Driving licence) | |
| ८ | वाहनाचा अदयावत विमा परवाना.(Valid insurance copy) | |
| ९ | अदयावत P.U.C.प्रमाणपत्र. | |
| | | |

वाहन मालक / फर्मधारकाची स्वाक्षरी.

नाव-

दिनांक-

उपसंचालक,
भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
छत्रपती संभाजीनगर.

नमुना क्रं -२

<u>भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, छ. संभाजीनगर</u>

**दुसरा लिफाफा**

**कार वाहन (सिडान प्रकारातील)**

दुस-या लिफाफ्यात निविदेतील विहीत BOQ मध्ये दर.,इंधन/वंगन दर असावेत .
टोलनाका रक्कम  पावतीसह या कार्यालयास देयकामध्ये सादर करावी ती वेगळयाने पावती तपासून देण्यात येईल.

| अ.क्रं. | मुद्दा | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | कार वाहनाचे पहिल्या २००० कि.मी.मासिक भाडे | |
| २ | तदनंतर वाहनाचे २००१ कि.मी.व त्यापुढील धावेस प्रति कि.मी.दर | |

(एकूण एकत्रित भाडे रू.५००००/-मर्यादा राहील)

**जिप वाहन** (बोलेरो,सुमो ई.प्रकारातील असावे)

| अ.क्रं. | मुद्दा | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | जिप वाहनाचे पहिल्या २००० कि.मी.मासिक भाडे | |
| २ | तदनंतर वाहनाचे २००१ कि.मी.व त्यापुढील धावेस प्रति कि.मी.दर | |

(एकूण एकत्रित भाडे रू.५००००/-मर्यादा राहील)

वाहन मालक / फर्मधारकाची स्वाक्षरी.

नाव-

दिनांक-

उपसंचालक,
भूजल  सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
छत्रपती संभाजीनगर.